जा.क्र.उपनि/ठाणे ता./बी-८/हौ./नां.रा.ठे./ ९२३ /सन २०१८
उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे तालुका यांचे कार्यालय,
राष्ट्संत अचार्य श्री. पद्मसागर सूरीश्वरजी (भवन) एम.बी.
एम. सी. बिल्डींग, शांती गार्डन, रामनगर, मिरारोड (पुर्व)
दिनांक :- १७/०४/२०१८

प्रति,
श्री. विकास खेतान (मुख्यप्रवर्तक),
(नियो) सेलेस्ट को-ऑप हौसिंग सोसा. लि,
सर्व्हे हिस्सा नं. ११०-१ (पीटी) , २२४-१ए (पीटी),
२२४-१ बी (पीटी), २६-७, २६-८ (पीटी),
व्हिलेज-घोडबंदर , मिरारोड (पुर्व) ता. जि. ठाणे.

विषय :- (नियो) सेलेस्ट को-ऑप हौसिंग सोसा. लि, मिरारोड (पुर्व) तालुका, जिल्हा ठाणे या संस्थेचे नांव राखून ठेवून बँकेत खाते उघडणेबाबत..

कृपया आपले लक्ष आपल्या दिनांक ०४/०४/२०१८ रोजीच्या वरील विषयासंबंधीच्या पत्राकडे वेधण्यांत येवून कळविण्यांत येते की, आपले नियोजित संस्थेचे नांव **(नियो) सेलेस्ट को-ऑप हौसिंग सोसा. लि, मिरारोड (पुर्व) तालुका,जिल्हा ठाणे** असे राखून ठेवण्यांत येत असून आपणांस नियोजित संस्थेच्या नांवाने **दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., शाखा- मिरारोड (पु) ता.जिल्हा-ठाणे.** या बँकेत खाते उघडणेसाठी परवानगी खालील अटींवर देण्यांत येत आहे .

१. नांव राखून ठेवल्यापासून तीन महिन्याचे आंत संस्थेचे नोंदणी प्रकरण शासनाने निश्चित करुन दिलेल्या अर्जासहित या कार्यालयास सादर करावे. तसेच सर्व गाळे खरेदी करार भारतीय नोंदणी कायदा १९०८ नुसार नोंदवून व मुद्रांक शुल्क भरल्याच्या पावत्यांच्या सत्यप्रती प्रकरणां सोबत जोडाव्यात.
२. राखून ठेवलेले नांव तीन महिन्यापर्यंत राहील. नोंदणी प्रकरण तीन महिन्याचे आंत न आल्यास नियोजित संस्थेचे नांव रद्द समजण्यांत येईल.
३. तीन महिन्यांत नोंदणी प्रकरण सादर करणे शक्य नसल्यास संयूक्तीक कारणास्तव मुदतीत मुदतवाढीसाठी अर्ज करावा.
४. नियोजित संस्थेच्या नांवाने खाते मुख्यप्रवर्तकांच्या सहीने उघडण्यांत यावे.
५. नियोजित संस्थेच्या नांवाने उघडलेल्या खात्यांतील रक्कम त्यांनी संस्था नोंदणी होऊन संस्थेच्या नावाने कारभार सुरु होई पर्यंत नोंदणी अधिका-यांच्या पूर्व परवानगी शिवाय काढण्यांत येवू नये.
६. नियोजित संस्थेस नांव राखून ठेवून बँकेत खाते उघडण्यास परवानगी दिली म्हणजे संस्था नोंदणी होईलच असे नाही, याची नोंद घ्यावी.
७. नियोजित संस्थेच्या नोंदणी प्रस्तावासोबत प्रवर्तक सदस्यांच्या करार नोंदणी पावत्यांच्या दोन्ही बाजूच्या छायांकित प्रती सादर कराव्यात.
८. नोंदणी प्रकरणांसोबत वकीलाची सही असलेले टाईटल सर्टीफिकेट जोडावे.
९. नोंदणी प्रस्ताव सादर करतेवेळी नांव राखून ठेवल्याबाबत परवानगी दिल्याबाबतची एक प्रत नोंदणी प्रस्तावाबरोबर जोडावी. तरी यापुढे संपूर्ण पत्रव्यवहार आपण नियोजित संस्थेच्या नावानेच करावा.
१०. मा.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे, यांचे कार्यालयाकडील दि. १९/०९/०९ रोजीच्या पोटनियम दुरुस्ती आदेशान्वये प्रत्येक सभासदांने भागभांडवलापोटी प्रत्येकी अधिमुल्य रु.५०/- चे १० भाग (शेअर्स) असे एकूण रु.५००/- व प्रवेश फी पोटी रु.१००/- असे एकूण रु.६००/- (अक्षरी रुपये सहाशे मात्र) भरुन घेण्यांत यावे.

उपनिबंधक,
सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे.